**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.संजय खंडुजी खरात
द्वारा-श्री.डी.व्ही.भांगरे, स.नं.३१/१,
मिलिंद निवास, चौधरी नगर, धानोरी, पुणे-४११ ०१५ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधिक्षक
भूमी अभिलेख पुणे - ४११ ००१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख, आंबेगाव (घोडेगाव), जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०२९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.०९.२००९ |
| ३. | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता-** श्री.संजय खंडुजी खरात<br>द्वारा-श्री.डी.व्ही.भांगरे, स.नं.३१/१,<br>मिलिंद निवास, चौधरी नगर, धानोरी, पुणे-४११ ०१५<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** अधिक्षक<br>भूमी अभिलेख पुणे - ४११ ००१ प्रतिनिधी श्रीमती सु.अ.भावसार<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** तालुका निरीक्षक,<br>भूमी अभिलेख, आंबेगाव (घोडेगाव), जि.पुणे श्री.एस.एस.इंदलकर | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.०१.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१४.०२.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०७.०३.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२३.०४.२००८ |
| ७ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>** - मौजे आमोंडी, ता.आंबेगाव, जि.पुणे येथील स.नं.३६२ हि.नं.१ मध्ये १ अ ह्या जमिनीच्या फाळणी बारा बाबतची माहिती | |

# शुध्दीपत्रक

**वाचा:-** आयोगाचे समक्रमांकाचे आदेश दि.२६.१०.२००९

आयोगाचे सदर आदेशामध्ये उपस्थित मध्ये जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे-१ ऐवजी तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, आंबेगाव (घोडेगाव), जि.पुणे असे वाचावे.

तसेच सदर आदेशातील विवेचनामधील परिच्छेद क्र.२ मध्ये, माहिती उपलब्ध होत नसल्याचे दि.०८.०८.२००८ रोजी श्री.खरात यांना कळविण्यात आले ऐवजी 'दि.१४.१०.२००८ रोजी श्री.खरात यांना कळविण्यात आले' असे वाचावे.

पुणे
दि. : २२.१२.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकिय इमारत, चौथा मजला,
कौन्सील हॉल समोर, पुणे ४११००१

श्री. किशोर टी. भिडे
स.नं. ४७, प्लॉट नं. ९०२, वॉर्ड नं. ३, सुनितानगर, — अपीलकर्ता
वडगाव शेरी, पुणे-१४.

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, — उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पुणे -१.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०३२/२००९/पुणे |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती-** अपिलकर्त्यांने अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडली नसल्याने मूळ माहिती मागणीचा बोध होत नाही. | |

## विवेचन

अपीलकर्ता, श्री. किशोर टी. भिडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपीलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे
दि. ३०.१२.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनिल प्रभाकर औटे
सुयोग निवास, सरपंच वस्ती, गोपाळवाडी रोड,
दौड, ता.दौंड, जि.पुणे ४१३ ८०१

**अपीलकर्ता**

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा**
निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
१) जिल्हा प्रकल्प अधिकारी,
नगरपालिका प्रशासन शाखा पुणे,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-१
२) मुख्याधिकारी, दौंड नगरपरिषद, ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०३७/२००९/पुणे +२०३८/२००९ / पुणे |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - दौंड नगरपरिषद हद्दीतील अतिक्रमणे व बेकायदेशीर बांधकामाबाबत | |

**विवेचन**

अपीलकर्ता, श्री.सुनिल प्रभाकर औटे सुयोग निवास, सरपंच वस्ती, गोपाळवाडी रोड, दौड, ता.दौंड, जि.पुणे ४१३ ८०१ यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलांसोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलांवर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपिले दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहेत.

पुणे
दि. : ३०-१२-२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे - ४११ ००१

श्री. गोरख काशिनाथ तावरे **अपीलकर्ता**
लक्ष्मी निवास, ३२४-ब, रविवार पेठ, कराड, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** निवासी उप जिल्हाधिकारी, सातारा, जि.सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** जिल्हा खनिकर्म अधिकारी सातारा,
जिल्हा सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **२०६२/२००९ / सातारा** |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>शासन जाहिरात धोरण २००१ ची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. गोरख काशिनाथ तावरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपीलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २८-१२-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. शिवाजी गुणाजी सावंत
द्वारा: दिपक गणपती खांडेकर,
मु. पो.वळीवडे, ता.करवीर, जि. कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर
**जन माहिती अधिकारी तथा** उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, हातकणंगले, जि. कोल्हापूर

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **२०७३/२००९/ कोल्हापूर** |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>शासकीय विश्रामगृह (शहापूर) इचलकरंजी येथील कर्मचा-यांची माहिती व विश्रामगृहातील दुरुस्तीच्या कामाबाबतची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. शिवाजी गुणाजी सावंत यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे
दि. २८.१२.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.श्रीरंग आनंदा माने
भवानीनगर, हिंगणे रोड, वडूज, ता.खटाव, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपील क्र.२०८**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, खटाव,
ता.खटाव, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, खटाव,
**ता.खटाव, जि.सातारा**

**अपील क्र.४५१**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती खटाव, ता.खटाव, जि.सातारा — उत्तरवादी

**जना माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत नढवळ, ता.खटाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०८+४५१ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.८.२००८ व ५.२.२००९ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.श्रीरंग आनंदा माने
भवानीनगर, हिंगणे रोड, वडूज, ता.खटाव, जि.सातारा

**<u>अपील क्र.२०८</u>**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, खटाव,
ता.खटाव, जि.सातारा श्री.व्ही.के.गडांकुश

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, खटाव,
ता.खटाव, जि.सातारा विद्यमान-श्री.बी.एस.मोहिते,
तत्कालीन-श्री.एम.एच.खाडे

**<u>अपील क्र४५१</u>**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती खटाव, ता.खटाव, जि.सातारा श्री.एम.बी.कोळी

**जना माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत नढवळ, ता.खटाव, जि.सातारा श्री.आर.एम.फडतरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.७.२००७ (अ.क्र.२०८)<br>दि.३.४.२००८ (अ.क्र.४५१) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१६.७.२००८ (अ.क्र.२०८)<br>दि. १६.७.२००८ (अ.क्र.४५१) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१८.६.२००७ (अ.क्र.२०८)<br>दि. १८.६.२००७ (अ.क्र.४५१) |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.६.२००८ (अ.क्र.४५१) |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. (अ.क्र.२०८+४५१) | |

# विवेचन

## अपील क्र२०८

राज्य माहिती आयोगाने दि.२१.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२१.८.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

बिनशेती भूखंडाचा लेआऊट व बिनशेती आदेशाची प्रत वारंवार मागणी करूनही मिळत नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.श्रीरंग आनंदा माने यांनी केली.

श्री.माने यांच्या मागणीनुसार अभिलेख कक्षात शोध घेण्यात आला, परंतु संबंधित माहिती मिळाली नाही. हीच माहिती ते वारंवार मागत असून वेळोवेळी त्यांना याबाबत कळविलेले आहे. बिनशेती भूखंडाच्या लेआऊटची प्रमाणित प्रत त्यांना दि.१.९.२००८ रोजी प्राप्त झाल्याबरोबर देण्यात आली आहे. त्यांनी मागितलेली माहिती सन १९८३ मधील असून क वर्गातील आहे. त्यातील माहिती अभिलेखात उपलब्ध नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, खटाव, ता.खटाव, जि.सातारा श्री.व्ही.के.गडांकुश व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खटाव, ता.खटाव, जि.सातारा श्री.एस.एच.खाडे व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खटाव, ता.खटाव, जि.सातारा श्री.बी.एस.मोहिते यांनी केले.

## अपील क्र४५१

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.५.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्याला सरकारने सहा गुंठे जमीन दिलेली असून गावठाणाचा लेआऊट व घर असलेल्या आपल्या भूखंडाचा उतारा याची वारंवार मागणी करूनही माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.श्रीरंग आनंदा माने यांनी केली.

ग्रामपंचायतीचे गाव पुनर्वसित आहे. संबंधित नोंदी ग्रामपंचायतीकडे नसून भूमी अभिलेख कार्यालयाकडून भूखंडाची मोजणी करून घ्यावी, त्यानंतर नोंदीबाबतची योग्य ती कार्यवाही करता येईल, असे श्री. माने यांना वेळोवेळी कळविण्यात आले. त्यांनी मागितलेली माहिती सन १९७५ ते १९८१ या काळातील आहे. मिळकतीचे ग्रामपंचायत उतारे आवश्यक शुल्क भरणा करून घेण्यास कळवूनही त्यांनी शुल्क भरलेले नाही. भूखंडाची मोजणी करून ग्रामपंचायत रजिस्टरला नोंद करून तसे उतारे मिळावेत, घर व भूखंडाच्या क्षेत्रफळाची नोंद उताऱ्यामध्ये दोन प्रतीत देण्यात यावी, अशी त्यांची मूळ अर्जातील मागणी असून ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपचायत नढवळ, ता.खटाव, जि.सातारा श्री.आर.एम.फडतरे व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी(पंचायत), पंचायत समिती खटाव, ता.खटाव, जि.सातारा श्री.एम.बी.कोळी यांनी केले. पुनर्वसनाशी संबंधित अधिकाऱ्यांकडून गावठाणाच्या लेआऊटची प्रत अपीलकर्त्यास प्राप्त करून द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत नढवळ, ता.खटाव, जि.सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी(पंचायत), पंचायत समिती खटाव, ता.खटाव, जि.सातारा, जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खटाव(वडूज), ता.खटाव, जि.सातारा यांनी कार्यवाही करून श्री.माने यांचा अर्ज नगररचना कार्यालय, सातारा यांच्याकडे हस्तांतरित केला. 'या कार्याल्याकडील उपलब्ध अभिलेखानुसार मौजे नढवळ, ता.खटाव, जि.सातारा या गावासाठी नियोजिलेल्या पुनर्वसनाबाबतच्या रेखांकन नकाशाच्या प्रतीसाठी आवश्यक शुल्क फी भरणा करण्याबाबत श्री.माने यांना कळविले. त्यांनी दि.१३.१.२००९ रोजी समक्ष कार्यालयात उपस्थित राहून शुल्क भरणा केल्यानुसार त्याच दिवशी नकाशाची प्रमाणित प्रत पोच घेऊन समक्ष दिली.

माहिती प्राप्त झाल्याने अर्ज निकाली काढण्यास हरकत नसल्याचे श्री.माने यांनी लेखी कळविले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचना, सातारा श्री.सुनिल मरळे यांनी आयोगाला सादर केलेल्या दि.२४.२.२००९ च्या अहवालात नमूद केले आहे.

दोन्ही अपिलांबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि.२३.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश किसन भिसे
मु.पो.केम, ता.करमाळा, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, आश्रमशाळा, केम,
ता.करमाळा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०८ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सोलापूर प्रतिनिधी श्री.एस.एस.कलशेट्टी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, आश्रमशाळा, केम,
ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.डी.जी.यादव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.११.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.२.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२०.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रमशाळा, केम, ता.करमाळा, जि.सोलापूर यांनी अपुरी दिली. फक्त शालेय पोषण आहाराबाबतच्या अहवालाची माहिती दिली. विद्यार्थ्यांचे उपस्थितीपत्रक दिले नाही. माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांनी देऊनही मुख्याध्यापकांनी माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.रमेश किसन भिसे यांनी केली.

श्री.भिसे यांनी जानेवारी २००६ मधील विद्यार्थ्यांच्या उपस्थिती पत्रकांची मागणी केली आहे. आपण दि.९.८.२००७ पासून मुख्याध्यापक पदाचा कार्यभार स्वीकारला असून आपल्या आधीचे मुख्याध्यापक श्री.साळुंखे यांनी दिलेल्या चार्ज यादीमध्ये उपस्थिती पत्रक नाही, त्यामुळे आपण ती देऊ शकत नसल्याचे त्यांना कळविले. श्री.साळुंखे यांच्या आधीच्या मुख्याध्यापक श्रीमती शकीनाबी अजमुद्दीन मुलाणी यानी संबंधित कागदपत्रे आपल्याकडे दिलेली नसल्याचे श्री.साळुंखे यांनी म्हटले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रमशाळा, केम, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.डी.जी.यादव यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.एस.एस.कलशेट्टी यांनी ते रास्त असल्याचे नमूद केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२२.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. आनंदराव बाबुराव पाटील — अपीलकर्ता
मु.पो. गडमुडशिंगी, ता. करवीर, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्राम पंचायत), जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि. कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, करवीर, ता. करवीर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.१२.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्राम पंचायत), जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि. कोल्हापूर<br>**जन माहिती अधिकारी** तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, करवीर, ता. करवीर, जि. कोल्हापूर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९.४.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

मौजे गडमुडशिंगी, ता. करवीर, जि.कोल्हापूर येथील शौचालय अनुदान वाटपासंबंधीची माहिती चौकशी सुरु असल्याच्या कारणावरून आपल्याला देण्यात आली नव्हती. ही चौकशी पूर्ण झाली की

नाही, या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती स्मरणपत्र देऊनही व दि. ३०.६.२००७ पूर्वी माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी दिल्यानंतरही जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, करवीर यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. आनंदराव बाबुराव पाटील यांनी केली.

श्री. पाटील यांनी गडमुडशिंगी येथील शौचालय अनुदानाबाबतची माहिती मागितली असली तरी सदरचे अनुदान हे ऊर्जा निर्माण संस्था, आरे, ता. करवीर व ऊर्जा निर्माण संस्था, तळाशी, ता. राधानगरी या दोन संस्थांद्वारे अदा केलेले आहे. ग्रामपंचायतीकडील कागदपत्रे उपलब्ध आहेत. तथापि ऊर्जा निर्माण संस्थेकडील कागदपत्रे संस्थेचे अध्यक्ष मयत असल्याने मिळू शकली नाहीत, त्यामुळे देता आली नाहीत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, करवीर श्री. ओ. के. गहाणे व अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. एम.व्ही. चौगुले यांनी केले. ग्रामपंचायत स्तरावरील उपलब्ध माहिती 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी मिळाली, असे अपीलकर्ता श्री. आनंदराव बाबुराव पाटील यांनी सांगितले. श्री. पाटील यांनी ग्रामपंचायतीकडील आणखी काही तपशील 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी मागितला. तो त्यांना देण्याचे व तळाशी येथील संस्था संचालकांच्या वारसांकडून माहिती मिळवून देण्याचे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले. मात्र त्यानुसार आपल्याला अद्यापही माहिती मिळाली नसल्याचे व आपले वय ७६ वर्षे असून माहितीसाठी वारंवार पाठपुरावा करणे शक्य नसल्याचे अपीलकर्ता श्री. पाटील यांनी लेखी व तोंडी नमूद केले. तसेच संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई व्हावी व आपल्याला खर्चाची भरपाई मिळावी, अशीही मागणी त्यांनी केली.

संबंधित अनुदान वाटपात भ्रष्टाचार झाला असल्याची अपीलकर्ता श्री. पाटील यांची तक्रार आहे. गट विकास अधिकारी हे पूर्वी जन माहिती अधिकारी होते व उप मुख्य कार्यकारी अधिकारी हे अपिलीय प्राधिकारी होते. नंतर विस्तार अधिकारी हे जन माहिती अधिकारी व गट विकास अधिकारी हे अपिलीय प्राधिकारी अशी व्यवस्था नंतर बदलण्यात आली.

श्री. पाटील यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करवीर श्री. एल.बी. मिसाळ यांनी वेळोवेळी मागणी करून व तत्कालीन गट विकास अधिकारी श्री. नितीन माने यांनी समक्ष सूचना देऊनही संबंधितांकडून प्राप्त झाली नाही. गट विकास

अधिकारी म्हणून आपण रूजू झाल्यानंतर मागणी केल्यानंतर शौचालय अनुदानाबाबतची माहिती दि. ५.१२.२००८ रोजी दिली. याबद्दलचा खुलासा सहाय्यक लेखाधिकारी, पंचायत समिती, करवीर श्री. डी.टी. काळगे यांच्याकडे आपण मागितला होता. तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, करवीर, पंचायत समिती, श्री. आर.जी. पाटील यांच्याकडून शौचालय अनुदानाबाबतचे दप्तर ताब्यात न दिल्यामुळे माहिती देता आली नाही, असे श्री काळगे यांच्या निवेदनातून दिसते. दप्तर ताब्यात न देणे व माहिती न देणे या संदर्भात तत्कालीन विस्तार अधिकारी, (पंचायत ) श्री. आर. जी. पाटील हेच सर्वस्वी जबाबदार आहेत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी श्री. नितीन माने यांनी केले. विद्यमान गट विकास अधिकारी वर्ग १, पंचायत समिती, करवीर श्री. ओ.के. गहाणे यांनीही दि. १०.१२.२००८ च्या पत्रान्वये तसे प्रतिपादन विस्ताराने केले. श्री. आर. जी. पाटील यांना दि. ३१.३.२००६, दि. १६.५.२००८ व दि. २७.८.२००८ रोजीच्या पत्रान्वये व दि. २७.८.२००८, ६.१२.२००८, ८.१०.२००८, १०.१२.२००८ रोजी तारेद्वारे दप्तर सादर करण्यास कळवूनही श्री.पाटील यांनी दप्तर ताब्यात दिले नाही. त्याबाबत दि.१०.१२.२००८ रोजी त्यांनी दिलेला खुलासा खोटा व दिशाभूल करणारा आहे, असे गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, करवीर श्री. ओ.के. गहाणे यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये नमूद केले आहे.

वरील तपशील लक्षा घेता तत्कालीन विस्तार अधिकारी, (पंचायत), श्री. आर.जी. पाटील हे विहित मुदतीत माहिती न देण्यास जबाबदार असल्याचे स्पष्ट होते. त्यांनी याबाबत आयोगाला खुलासा सादर करावा, असे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, करवीर श्री. ओ.के.गहाणे यांनी कळवूनही श्री. पाटील यांनी याबाबत समर्थनीय खुलासा सादर केलेला नाही. सर्व संबंधितांची निवेदने व अनुषंगिक कागदपत्रे लक्षात घेता श्री. आर.जी.पाटील शास्तीस पात्र ठरतात. तसेच अपीलकर्त्याचे वय व त्यांनी केलेला पाठपुरावा लक्षात घेता खर्चाची प्रतिकात्मक भरपाई त्यांना मिळणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. वारंवार स्मरणपत्र देऊनही दप्तर सादर न करणे व त्यामुळे माहिती नाकारणे याबद्दल विस्तार अधिकारी (पंचायत), श्री. आर.जी. पाटील यांना रू.२५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची

रक्कम श्री. पाटील यांच्या डिसेंबर २००९ च्या व जानेवारी २०१० च्या अनुक्रमे जानेवारी २०१० व फेब्रुवारी २०१० मध्ये देय असलेल्या वेतनातून दोन समान हप्त्यात कपात करून दि. ५.२.२०१० पर्यंत ००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१) या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही गट विकास अधिकारी, पंचायत समिती, करवीर, जि. कोल्हापूर यांनी करावी. तसेच याबाबतची नोंद त्यांच्या सेवापुस्तक / गोपनीय अहवालात घेण्यात यावी.

३. अपीलकर्त्यास माहितीसाठी करावा लागणारा पाठपुरावा व झालेला मनस्ताप या पोटी विस्तार अधिकारी, पंचायत समिती श्री. आर.जी. पाटील यांनी रू. ५००/- भरपाई अपीलकर्त्यास दि. १०.१.२०१० पर्यंत द्यावी.

वरील दोनही बाबींची पूर्तता करून घेऊन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, करवीर, जि. कोल्हापूर यांनी आयोगास अहवाल सादर करावा.

**पुणे**
**दि. ११.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शंकर बापू मगदूम
मु.पो.गुडमुडशिंगी, ता.करवीर, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, कोल्हापूर,
जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हपूर, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा करमणूक कर अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शंकर बापू मगदूम
मु.पो.गुडमुडशिंगी, ता.करवीर, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, कोल्हापूर,
जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हपूर, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.ए.एस.सूर्यवंशी

**जन माहिती अधिकारी** तथा करमणूक कर अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.ए.एस.सूर्यवंशी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.७.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.८.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

राजीव गांधी नागरी सहकारी पतसंस्थेच्या संदर्भात केलेल्या कारवाईची माहिती आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याचे कळवून जन माहिती अधिकारी तथा करमणूक कर अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली. माहिती न देण्याची कारणे आदि तपशील जन माहिती अधिकाऱ्यांनी देणे आवश्यक असताना दिलेला नाही, संबंधित माहितीचे प्रकरण चौकशीवर प्रलंबित असताना माहिती देण्याबाबत योग्य कार्यवाही केली नाही, असा निष्कर्ष नोंदवून संबंधित प्रकरणाची सद्यस्थितीची माहिती अपीलकर्त्यास द्यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांनी दिला. त्यानंतर आपल्याला माहिती देण्यात आली. सुमारे ३५ दिवस विलंबाने माहिती दिली, त्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकाऱ्यावर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.शंकर बापू मगदूम यांनी केली.

संबंधित प्रकरणातील ठोस कारवाईची माहिती द्यावी व ठोस कारवाई केली नसल्यास दप्तर दिरंगाईच्या कायद्यानुसार केलेल्या किंवा प्रस्तावित असलेल्या कारवाईचा तपशील द्यावा, अशी मागणी अपीलकर्त्याने केली होती. तथापि ठोस कारवाई झालेली नव्हती, चौकशी चालू होती. त्यामुळे कोणी कर्मचारी काहीतरी सांगण्याचा व त्यांच्यावरील कारवाईचा प्रश्न नव्हता. त्यामुळे त्यांनी कार्यालयाकडे माहिती नसल्याचे कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांच्या निर्णयानंतर या संदर्भातील कागदपत्रांच्या प्रती श्री.मगदूम यांना पुरविल्या. मात्र संबंधितांवर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर व

जिल्हा सहनिबंधक, कोल्हापूर यांनी कारवाई केल्याचा अहवाल जिल्हाधिकारी, कोल्हापूर कार्यालयाला प्राप्त झालेला नाही. या संदर्भात श्री.मगदूम यांनी वेळोवेळी मागणी केलेली माहिती त्या त्या वेळी त्यांना देण्यात आली आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा करमणूक कर अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर श्री.ए.एस.सूर्यवंशी यांनी केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२३.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.श्रीरंग आनंदा माने
भवानीनगर, हिंगणे रोड, वडूज, ता.खटाव, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१३ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.श्रीरंग आनंदा माने
भवानीनगर, हिंगणे रोड, वडूज, ता.खटाव, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्रीमती नयना बोंदार्डे

**जन माहिती अधिकारी** तथा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.अजय पवार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.११.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२१.८.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

धरणग्रस्त म्हणून शासनाने वडिलांना मंजूर केलेल्या जमिनीच्या नोटिशीची नक्कल आपल्याला वारंवार मागणी करूनही मिळत नाही. मिळालेली जमीन थोरल्या भावाने घेतली असून त्याबाबत न्यायालयात दावा चालू आहे, त्यासाठी आपल्याला ही माहिती मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.श्रीरंग आनंदा माने यांनी केले.

संबंधित जमीन वाटपाची कार्यवाही सन १९७७ मधील आहे. जमीन वाटपाचा आदेश व वाटपाची नोंदवही यांच्या प्रती श्री.माने यांना देण्यात आल्या. मूळ नोटीस त्यावेळी कै.आनंदा नागू माने यांना देण्यात आली, त्याची छायांकित सत्यप्रत अपीलकर्त्याकडे उपलब्ध आहे, परंतु अभिलेखात नोटीस उपलब्ध नाही. शोध घेऊनही ती प्राप्त झालेली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार पुनर्वसन, सातारा जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.अजय पवार व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सातारा जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्रीमती नयना बोंदार्डे यांनी केले. याबाबतची सर्व वस्तुस्थिती श्री.माने यांना स्पष्ट करण्यात आली असून आपली तक्रार राहिली नसल्याचे त्यांनी दि.११.७.२००७ रोजी लेखी दिले आहे, असेही त्यांनी नमूद केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असून संबंधित कागदपत्रांबाबत जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार(पुनर्वसन), सातारा जिल्हाधिकारी

कार्यालय, सातारा यांनी पुन्हा शोध घेऊन अपीलकर्त्यास कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अशा प्रकारच्या नोटिसा उपलब्ध झाल्या नसल्याचे व त्यामुळे नकला देता आल्या नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार(पुनर्वसन), सातारा जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.अजय पवार यांनी दि.५.१२.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.३१.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.आप्पासाहेब बापू पाटील
कवडगेमळा, पानवेली बिल्डिंग, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी कोल्हापूर,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१४ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.९.२००६ व ३१.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीला कोणताही पक्षकार हजर नव्हता.

महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणापुढील दाव्याच्या नकलांची प्रत वारंवार मागणी करूनही न मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.आप्पासाहेब बापू पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री.पाटील यांनी मूळ अर्जात संबंधित दाव्याबाबतचा चुकीचा क्रमांक दिला होता व पक्षकारांची नावे, निकालाची तारीख आदि तपशील दिला नव्हता. त्याबाबत त्यांना कळविले. त्यानंतर त्यांनी पक्षकारांची नावे दिली, परंतु निकालाची तारीख दिली नाही. शेवटी विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्या कार्यालयाकडून चौकशी करून संबंधित दाव्याचा क्रमांक, निकालाची तारीख आदी तपशील शोधून निकालाची नक्कल अपीलकर्त्यास देण्यात आली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, कोल्हापूर श्री.मिलिंद पाठक यांनी केले. ते लक्षात घेता अपीलकर्त्याने स्वतः नेमकेपणा न राखता सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम यावर अकारण ताण निर्माण केल्याचे दिसते. अपीलकर्त्याची ही कृती अयोग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि३१.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. मधुकर मारूतीराव पंडित — अपीलकर्ता
कृष्णा अपार्टमेंट, फ्लॅट नं.२, डीएड
कॉलेजजवळ, लक्ष्मीनगर, फलटण, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, फलटण कार्यालय, फलटण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१७ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.८.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. मधुकर मारूतीराव पंडित<br>कृष्णा अपार्टमेंट, फ्लॅट नं.२, डीएड कॉलेजजवळ,<br>लक्ष्मीनगर, फलटण, जि.सातारा |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण<br>जि. सातारा श्री. किरण साताप्पा गौतम |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, फलटण<br>कार्यालय, फलटण, जि. सातारा<br>श्री. कांतीलाल अर्जुन भोसले |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.६.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.५.२००७ |

| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कायक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये त्यावेळी एकमत झाले नसल्यामुळे त्याच दिवशी सुनावणी घेण्यात आली.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत सन २००५-२००६ मध्ये ४८ शाळामध्ये एकाच कुटुंबाकडून तीन कोटेशन मागवून संगणक खरेदी झाली, त्याबाबतची माहिती सातत्याने पत्रव्यवहार करूनही पारदर्शकतेने दिली जात नाही. या खरेदीत शासकीय अनुदानाचा २४ लाख रूपयांचा अपहार झाला असल्यामुळे माहिती दिली नाही, त्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण, जि. सातारा यांनीही त्यावर पांघरूण घालून अपिलाची योग्य दखल घेतली नाही.

श्री. मधुकर मारूतीराव पंडित यांनी वेळोवेळी या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहारानुसार त्यांना माहिती देण्यात आली होती. अपहार झाल्याची तक्रार व त्याबाबत कार्यवाही करणे हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. एकूण ९९६ पानांची माहिती श्री. पंडित यांना निःशुल्क दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, फलटण श्री. कांतीलाल अर्जुन भोसले यांनी केले.

वस्तुतः अपीलकर्त्याने प्रत्येक शाळेकडे स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक होते. तसेच संगणक खरेदीबाबत व अन्य व्यवहाराबाबत शंका असल्यास शिक्षण अधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सातारा यांच्याकडे त्यांनी दाद मागणे उचित ठरले असते. तसेही त्यांना कळविण्यात आले, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण श्री. किरण साताप्पा गौतम यांनी केले. प्रत्येक शाळेला स्वतंत्र जन माहिती अधिकारी असल्यामुळे अपीलकर्त्याने त्या त्या शाळेकडे माहिती मागणे आवश्यक होते. एकाहून अधिक शाळांकडे अर्ज वर्ग करून जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती मागवून द्यावी, अशी अपेक्षा करता येणार नाही. तथापि जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, फलटण यांनी संगणक खरेदी संदर्भातील कार्यवाहीचा लेखी अहवाल आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

महाराष्ट्र राज्य, प्राथमिक शिक्षण परिषदेने दिलेल्या निकषाप्रमाणे अटी पूर्ण करणाऱ्या ४८ शाळांना २८ लाख रूपयांचे अनुदान वर्ग करण्यात आले. ग्राम शिक्षण समिती / शाळा समिती यांच्या परवानगीने मुख्याध्यापक स्तरावर संगणक खरेदी करण्यात आली आहे. गट शिक्षण अधिकारी कार्यालयाचा त्याबाबत कोणताही हस्तक्षेप झालेला नाही, असा अहवाल जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती फलटण श्री. कांतीलाल अर्जुन भोसले यांनी दि. १७.९.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. विहित मुदतीत अहवाल सादर न करणे व त्याबाबत आयोगाकडून वारंवार स्मरणपत्र द्यावी लागणे ही बाब गंभीर असून त्याबाबत जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, फलटण श्री. कांतीलाल अर्जुन भोसले यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ११ .१२.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**